लोकमत

# मेट्रोतून उतरायचे आणि विमानात बसायचे !

## वेगवान प्रवासासाठी एमएमआरडीतर्फे कामे सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशाचा वेग अधिकाधिक वाढावा, प्रवास वेगवान व्हावा, प्रवाशांचा वेळ वाचावा म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे हाती घेण्यात आलेल्या मेट्रोची कामे वेगाने सुरू असून, सिडकोसह मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने या कामांना जोड दिली आहे. मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडच्या पहिल्या म्हणजे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रोने ही सफर अधिक वेगवान केली असतानाच मेट्रो ७ ने यात भर घातली आहे. विशेष म्हणजे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रोने जोडतानाच आता नवी मुंबई विमानतळ मेट्रो २ ब ने जोडण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रोचे जाळे पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना विनासायास मेट्रो ते विमानतळ असा थेट प्रवास करता येणार आहे.

### मेट्रो ७ अ :

अंधेरी पूर्व - सीएसएमआयए या मार्गामुळे विमानतळ आणखी जवळ येणार आहे.

### मेट्रो ३ :

एमआयडीसी, सीप्झ, विधान भवन, मरोळ नाका, कफ परेड, सिद्धिविनायक, चर्चगेट, हुतात्मा चौक, मुंबई सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांचे बांधकाम जवळजवळ पूर्ण होत आले आहे.

१ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ डिसेंबर २०२४ पर्यंत कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

२ मुंबई व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास जोडणारी वाहतूक अत्यंत महत्त्वाची आहे.

३ ही वाहतूक जोडणी दोन महत्त्वाच्या विमानतळांना जोडणारा दुवा असेल.

### महत्त्वाची केंद्रे जोडणार

- नरिमन पॉइंट, वरळी, वांद्रे-कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्त्वाची केंद्रे मेट्रो ३ जोडणार.
- मेट्रो ३ मुळे कुलाबा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रवास ५० मिनिटांत करणे सहज शक्य होणार आहे.



**प्रवासाची सहजता वाढविण्यासाठी विमानतळाच्या आत मेट्रो टर्मिनलकरता प्रवेश दिला जाईल.**

- एमएमआरडीएतर्फे दोन्ही विमानतळांना जोडणाऱ्या मेट्रो लाइन ८ चे कार्य नियोजित आहे.
- **छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते मानखुर्द हा ११.१ किलोमीटरचा पल्ला एमएमआरडीएने डीएमआरसीच्या साहाय्याने पूर्ण केला.**
- मेट्रो लाइन ८ च्या उर्वरित कार्यासाठी सिडकोने पुढाकार घेत मानखुर्द ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यानचे काम हाती घेतले आहे.
- **बेलापूर नवी मुंबई मेट्रो लाइन १ मार्ग नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जोडण्याचे काम यात प्रस्तावित आहे.**